28-05-2025-Dai-01_DH_PAN_01_04_2016-1.qxp 27-05-2025 21:46 Page 1

मलभाट परिसरात सांडपाण्याची समस्या गंभीर

पान ३ वर

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com

कुश मैनीने रचला इतिहास!

पान ४ वर

वेर्णा, बुधवार, २८ मे २०२५ | पाने ४ | ₹ ४

| REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 265 | Verna, | facebook.com/dainikherald | Wednesday 28 May 2025 | Pages 4 | ₹ 4

निवडक

न्यायमूर्ती बी.व्ही. नागरत्ना देशातील पहिल्या महिला सरन्यायाधीश

बंगळुरू, दि. २७ : न्यायमूर्ती बी.व्ही. नागरत्ना या सर्वोच्च न्यायालयाच्या कॉलेजियममध्ये सामील होणाऱ्या पहिल्या महिला न्यायाधीश ठरल्या आहेत. २३ मे रोजी न्यायमूर्ती अभय श्रीनिवास ओक यांच्या निवृत्तीनंतर, २५ मे रोजी न्यायमूर्ती नागरत्ना या सर्वोच्च न्यायालयाच्या पाचव्या सर्वात वरिष्ठ न्यायाधीश बनल्या. सर्वोच्च न्यायालयाच्या कॉलेजियममध्ये फक्त ५ सर्वात वरिष्ठ न्यायाधीश शिल्लक आहेत, ज्यामध्ये भारताचे सरन्यायाधीश म्हणजेच उगख यांचाही समावेश आहे.
भारतात, सरन्यायाधीशांची नियुक्ती ही ज्येष्ठतेवर आधारित असते. अशा परिस्थितीत, बी.व्ही. नागरत्ना ११ सप्टेंबर २०२७ रोजी भारताच्या ५० व्या सरन्यायाधीश होतील. या पदावर पोहोचणाऱ्या त्या पहिल्या महिला असतील. त्यांचा कार्यकाळ अंदाजे १ महिन्याचा असेल. त्या २९ ऑक्टोबर २०२७ रोजी सरन्यायाधीश पदावरून निवृत्त होतील. नागरत्ना यांचा जन्म ३० ऑक्टोबर १९६२ रोजी बंगळुरू येथे न्यायमूर्ती ई. एस. व्यंकटरमैय्या यांच्या घरी झाला. न्यायमूर्ती व्यंकटरमैया नंतर (१९८९) सरन्यायाधीश झाले. अशा परिस्थितीत, नागरत्ना यांना लहानपणापासूनच घरात कायद्याच्या शिक्षणाचे वातावरण मिळाले.

पंजाबमध्ये निवासी वसाहतीत बॉम्बस्फोट

अमृतसर, दि. २७ : पंजाबमधील अमृतसरमधील मजिठा रोड बायपासवर मंगळवारी सकाळी बॉम्बस्फोट झाला, ज्यामध्ये एक व्यक्ती गंभीर जखमी झाला. त्या व्यक्तीचे हातपाय चिंध्यासारखे उडून गेले. त्याचे संपूर्ण शरीर रक्ताने माखलेले होते. ज्या लोकांनी स्फोट ऐकला आणि त्या व्यक्तीला पाहिले ते म्हणतात की, येथे बॉम्ब स्फोट झाला आहे. तथापि, पोलिसांनी सुरुवातीला याची पुष्टी केली नाही. पोलिस अधिकाऱ्यांनी सांगितले की, स्फोटाचे कारण अद्याप तपासले जात आहे. तर, नंतर एसएसपींनी कबूल केले की हा बॉम्बस्फोट होता. त्यांनी दहशतवादी हल्ल्याची भीतीही व्यक्त केली आहे. ते म्हणाले की, पाकिस्तान वातावरण बिघडवण्याचे कट रचत आहे. जखमी झालेला व्यक्ती शस्त्रांचा साठा घेण्यासाठी आला होता. दरम्यान, एक स्फोट झाला आणि त्याचे तुकडे झाले.
घटनास्थळी आगही लागली. त्याबाबत पोलिसांचे म्हणणे आहे की ही आग स्फोटामुळे लागली असावी. सध्या जखमीला रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. पोलिसांच्या मते, त्याच्या वाचण्याची शक्यता कमी आहे.

गावडेंनी दिले विरोधकांच्या हाती आयते कोलीत

■ टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. २७ : आदिवासी कल्याण खात्यातील भ्रष्टाचाराबद्दल क्रीडा मंत्री गोविंद गावडे यांनी केलेल्या वक्तव्याबाबत काँग्रेसने मंगळवारी सरकारवर जोरदार हल्लाबोल केला. 'मंत्री जे बोलले ते सत्यच आहे. सरकार त्यांच्या आरोपांची चौकशी करण्याऐवजी भ्रष्टाचार उघड केला म्हणून त्यांना टार्गेट करत आहे', अशी टीका काँग्रेसचे दक्षिण गोव्याचे खासदार विरियातो फर्नांडिस यांनी केली . त्यांनी गावडे यांना पाठिंबा दिला. तर 'सावंत सरकारला अंतर्गत संघर्षाने ग्रासले आहे. मंत्री आणि सत्ताधारी आमदार पैशांवरून आपापसांत भांडत आहेत,' अशी टीका काँग्रेसचे गोवा प्रभारी माणिकराव ठाकरे यांनी केली.

दरम्यान, गावडे जे काही बोलले, ते चुकीचेच आहे. त्यांनी तक्रार योग्य व्यासपीठावर मांडायला हवी होती. एक तर प्रदेशाध्यक्ष म्हणून माझ्याकडे किंवा मुख्यमंत्र्यांकडे बोलायला हवे होते, असे सांगत भाजप प्रदेशाध्यक्ष दामू नाईक यांनी गावडे यांच्यावर कारवाईबाबत पक्ष ठाम असल्याचे स्पष्ट केले. दुसरीकडे मंत्री गावडे यांनी कुठेही मुख्यमंत्र्यांवर टीका केलेली नाही, असा दावा 'उटा'चे अध्यक्ष प्रकाश वेळीप यांनी केला.

विरियातो म्हणाले की, 'गावडे सत्यच बोलले, परंतु आता त्यांना लक्ष्य केले जात आहे. मुख्यमंत्र्यांनी खरे तरत्यांच्या आरोपांची चौकशी करायला हवी. सत्य बोलले म्हणून त्यांना शाबासकी मिळायला हवी होती, परंतु गावडे यांच्या मागे ससेमिरा लावला.' खासदार म्हणाले की, चार दिवसांपूर्वी केंद्रीय भूपृष्ठ वाहतूकमंत्री नितीन गडकरी गोव्यात आले होते. झुआरी नदीवरील दोन टॉवरची कोनशिला बसवण्याच्या कार्यक्रमात ते म्हणाले होते की, जेव्हा आम्ही मोठे रस्ते प्रकल्प हाती घेतो, तेव्हा काही मंत्री, आमदारांना ही गोष्ट कळल्यावर जमिनी घेतात. या सरकारच्या काळात भ्रष्टाचार फोफावला आहे.

दरम्यान भाजपच्या नेतृत्वाखालील राज्य सरकारवर टीका करताना, फातोर्ड्याचे आमदार आणि गोवा फॉरवर्ड पार्टीचे अध्यक्ष विजय सरदेसाई यांनी राज्यातील भ्रष्टाचाराची गंभीर स्थिती उघड केली आहे. त्यांनी सांगितले की, भ्रष्टाचार इतक्या प्रमाणात संस्थागत स्वरूप धारण करीत आहे की आता राज्यातील मंत्रीही त्यांच्या स्वतःच्या सरकारवर टीका करायला लावले आहेत. मंत्री गोविंद गावडे यांनी त्यांच्या विभागाशी संबंधित कंत्राटदारांना फायली मंजूर करुन घेण्यासाठी लाच द्यावी लागते असा आरोप प्रेरणा दिन कार्यक्रमात केला होता यावर प्रतिक्रिया देताना सरदेसाई म्हणाले की, ही टिप्पणी सरकारच्या अंतर्गत असलेल्या निराशेचे स्पष्ट लक्षण आहे.

सरदेसाई पुढे म्हणाले की, एक अंतर्गत सूत्र असल्याने, त्यांना चांगले माहित असले पाहिजे की गोव्यातील भाजप सरकारने आपल्या सर्व विभागांमध्ये भ्रष्टाचार कसा जोपासला आहे आणि त्याला प्रोत्साहन दिले आहे. हे गोव्यातील प्रत्येक नागरिकाला माहीत आहे.त्यांनी यासोबतच गेल्या काही वर्षांत अनेक भ्रष्टाचार प्रकरणे उघडकीस आणल्याचा दावा केला आणि सरकारमुळे गोवा अपरिवर्तनीय विनाशाच्या मार्गावर आहे, असेही सांगितले. गावडे यांनी मुख्यमंत्र्यांच्या देखरेखीखालील मंत्रालयाचा उल्लेख केल्यामुळे, सरदेसाई म्हणाले की आता गोव्यात मुख्यमंत्र्यांकडून कठोर कारवाईची अपेक्षा आहे.

मंत्री गावडे यांना 'उटा'चा पूर्ण पाठिंबा

गावडेंचे विधान चुकीच्या संदर्भात घेतले गेले : 'उटा'

■ टीम दैनिक हेराल्ड

मडगाव, दि. २७ : कला आणि संस्कृती मंत्री गोविंद गावडे यांच्यावरील टीकांबाबत युनायटेड ट्रायबल असोसिएशन अलायन्स (उटा)ने त्यांच्याच्या समर्थनार्थ ठाम भूमिका घेतली असून, गावडे यांनी केलेली विधाने मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत किंवा राज्य सरकारविरोधात नव्हती, असा खुलासा केला आहे.

पत्रकार परिषदेत बोलताना यूटीएएचे अध्यक्ष प्रकाश वेळीप यांनी सांगितले की, मंत्री गावडे यांनी केवळ आदिवासी कल्याण विभागातील अधिकाऱ्यांच्या कार्यक्षमतेअभावी निर्माण झालेल्या अडचणींबाबत नाराजी व्यक्त केली होती. त्यांचे विधान कोणत्याही प्रकारे मुख्यमंत्री किंवा सरकारविरोधी नव्हते.

वेळीप यांनी स्पष्ट केले की गावडे हे आदिवासी समाजाच्या प्रगतीसाठी कटिबद्ध आहेत. त्यांनी विकास प्रकल्पांतील विलंब, विशेषतः आदिवासींना समर्पित इमारतींच्या कामाच्या रखडलेल्या प्रगतीबाबत चिंता व्यक्त केली होती. त्यांनी संबंधित विभागाच्या कामकाजाच्या धीम्या गतीकडे लक्ष वेधले, हे सरकारविरोधात नव्हते, असे त्यांनी सांगितले.

श्रमशक्ती भवनातील फायलींच्या मंजुरीबाबत कथित भ्रष्टाचाराच्या चर्चांवर प्रतिक्रिया देताना वेळीप म्हणाले की, गावडे यांनी कुणावरही थेट आर्थिक गैरव्यवहाराचे आरोप केलेले नाहीत. त्यांनी लाचखोरीचा उल्लेखही केलेला नाही. त्यामुळे त्यांच्या विधानांचे अपसमज दूर करणे आवश्यक आहे.

उटाने सध्याच्या प्रशासकीय रचनेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत आदिवासी कल्याण विभागासाठी स्वतंत्र मंत्री नेमण्याची शिफारस केली आहे. मुख्यमंत्र्यांना या मागण्या आणि भावना स्पष्टपणे सांगितल्या आहेत, असे वेळीप यांनी सांगितले. यूटीएएचे कार्यकारी अध्यक्ष विश्वास गावडे यांनीही मंत्री गोविंद गावडे यांच्याबद्दल सकारात्मक भूमिका मांडली. गावडे यांनी नेहमीच आदिवासी समुदायाच्या हितासाठी काम केले आहे. सध्या ते राज्याबाहेर आहेत, मात्र परतल्यानंतर ते आपली भूमिका स्पष्ट करतील. संघटना त्यांच्या पाठीशी ठाम आहे, असे त्यांनी सांगितले. दरम्यान, भाजपचे प्रदेशाध्यक्ष दामू नाईक आणि खासदार सदानंद शेट तानावडे यांची आदिवासी नेत्यांनी भेट घेतली असून, मंत्री गावडे यांनी कोणतेही अनुचित किंवा बदनामीकारक विधान केले नसल्याचे स्पष्ट केले आहे. मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनीही यूटीएएच्या प्रतिनिधींना त्यांच्या चिंतेबाबत सकारात्मक प्रतिसाद देण्याचे आश्वासन दिले.

मंत्री गावडे यांच्याविरुद्ध कारवाई होण्याच्या शक्यतेबाबत विचारले असता, विश्वास गावडे म्हणाले की, संघटना सर्व बाजू समजून घेतल्यानंतरच पुढील निर्णय घेईल. उटाने सरकारकडे मागणी केली आहे की, मंत्री गावडे यांच्यावरील आरोपांचे निष्पक्ष मूल्यांकन करण्यात यावे आणि कोणतीही कारवाई केवळ चुकीच्या समजुतीच्या आधारे करू नये.

कळंगुटमध्ये बनावट चॉकलेटचा मोठा साठा जप्त

■ टीम दैनिक हेराल्ड

▶ प्रमुख पुरवठादाराचा पर्दाफाश

▶ व्यवसाय सील

कळंगुट, दि. २७ : अन्न व औषध प्रशासनाच्या (एफडीए) पथकाने सोमवारी रात्री उशिरा कळंगुटमध्ये बनावट ॲनालॉग' चॉकलेटचा प्रमुख पुरवठादार पकडला. या प्रकरणाचा तपास गेल्या पंधरवड्यापासून सुरू होता. छाप्यात सुमारे ३ लाख रुपये किमतीची चॉकलेटसदृश बनावट उत्पादने जप्त करण्यात आली असून नऊ नमुने प्रयोगशाळा चाचणीसाठी पाठवले आहेत.

एफडीएच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, बनावट चॉकलेट्सवर 'महिमा एंटरप्रायझेस' या नावाचे लेबल लावून ती उत्पादने कळंगुट, कांदोळी, हडफडे आणि हणजूण परिसरातील विविध दुकानदारांना पुरवली जात होती. ही चॉकलेट उत्पादने मूळच्या चोको बटरऐवजी वनस्पतीजन्य चरबीपासून बनवण्यात आलेली होती, ज्यामुळे ती ग्राहकांच्या आरोग्यास गंभीर धोका ठरू शकतात.

गेल्या तीन ते चार महिन्यांत अन्न व औषध प्रशासनाच्या निरीक्षणात अनेक दुकानांमध्ये संशयास्पद चॉकलेट उत्पादने सापडली होती. लेबलवर दिलेला पत्ता पर्रा (कळंगुट–म्हापसा रस्ता) येथे शोध घेतला असता, तो खोटा असल्याचे स्पष्ट झाले. अखेर कळंगुटमधील एका ठिकाणी संशयित व्यक्ती राहत असल्याची माहिती पान २ ▶

KIIT
KALINGA INSTITUTE OF INDUSTRIAL TECHNOLOGY (KIIT)
Deemed to be University
(Established U/S 3 of UGC Act 1956), Bhubaneswar, Odisha, India

15th nirf Among Indian Universities Ranked by NIRF, Govt. of India
A++ Grade Accredited by NAAC
Tier 1 Re-accredited by NBA All Engineering Programs for 6 Years

KIITEE 2025 PHASE - 2
APPLY ONLINE
through KIIT Websites
www.kiitee.ac.in / www.kiit.ac.in
Last Date to Apply 4th June 2025 | No Examination Fee (Computer-Based Test)
KIITEE 2025 Online Test (Phase -2) starts from
8th June to 12th June 2025

Special Consultative Status by the UN-ECOSOC
ABET (US) Accreditation
THE 601-800 University Ranking 2024 World University Rankings
IET ACCREDITED PROGRAMME The Institute of Engineering and Technology

ACADEMIC PROGRAMMES AVAILABLE

UG (3 years/4 years)/Integrated (5 years) Programmes [All 4 years Programmes are with Honors/Research]

B.Tech Programmes
- Civil
- Construction Technology
- Electrical
- Electrical & Computer Science
- Mechanical
- Mechanical (Automobile)
- Aerospace
- Mechatronics
- Electronics & Telecommunication
- Electronics & Computer Science
- Electronics & Electrical
- Electronics (VLSI Design & Technology)
- Chemical
- Computer Science & Engineering (CSE)
- CSE (Artificial Intelligence & Machine Learning)
- CSE (Artificial Intelligence)
- CSE (Cyber Security)
- CSE (Data Science)
- CSE (Internet of Things & Cyber Security including Block Chain Technology)
- CSE (Internet of Things)
- Information Technology
- Computer Science & System
- Computer Science & Communication

UG Programmes in other Disciplines
- B.Design (Automobile/ Graphic/Product)
- B.Design (Fashion / Textile)
- B.Tech & M.Tech Biotechnology (5yrs)
- B.Tech (Lateral Entry)
- B.Arch
- BCA
- BBA
- B.Sc (Hospitality & Tourism)
- Bachelor of Film & Television Production
- Bachelor of Communication & Journalism
- Bachelor of Physical Education & Sports
- BA Economics
- BA Sociology
- BA English
- BA Psychology
- BA French
- BA Spanish
- BA Japanese
- BA German
- B.Com
- B.Sc (Economics & Data Analytics)
- B.Sc Computer Science
- B.Sc Nursing
- B.Pharma
- D.Pharma
- BA LLB/BBA LLB/B.Sc LLB (Hons) 5yrs

PG (1 year/2 years)/Integrated (5 years) Programmes
- M.Tech
- LLM (1yr)
- MCA
- M.Sc Biotechnology
- M.Sc Applied Microbiology
- M.Arch
- MBA
- MBA in Rural Management
- MBA in Agribusiness Management
- MBA-IEV (Innovation, Entrepreneurship and Venture Development)
- Master of Communication & Journalism
- Master in Urban & Regional Planning
- Master in Yoga & Naturopathy
- Master of Hospital Administration
- Master of Public Health
- MA in Fashion Management
- M. Design (Interior)
- M.Sc Computer Science
- MA Economics
- MA Sociology
- MA English
- MA Psychology
- Master in Public Policy
- M.Com
- M.Sc Physics
- M.Sc Chemistry
- M.Sc Mathematics & Data Science
- Master in Library & Information Sciences
- Master in Physical Education & Sports
- M.Sc Nursing
- Integrated M.Tech & Ph.D
- Ph.D

CAMPUS PLACEMENT 2024 HIGHLIGHTS
700+ Companies
5585+ Job Offers
₹53 LPA Highest Salary Offered
₹8.50 LPA Average CTC
1500+ Paid Internships
1000+ Students with multiple job offers

Director, Admissions : Admission Cell, Koel Campus, Po- KIIT, Bhubaneswar-751024, Odisha, India,
Ph: 8080 735 735, Fax : 0674 - 2741465, Email: admission@kiit.ac.in, Website: www.kiitee.ac.in

KIIT (Deemed to be University) has only one permanent campus in Bhubaneswar, Odisha.
It has no other campus / off campus anywhere else in the country and globe.

१०७ शेतकऱ्यांच्या भातपिकाचे नुकसान

■ टीम दैनिक हेराल्ड

▶ ८ लाखांचा फटका

▶ शेतकरी हवालदिल

फोंडा, दि. २७ : यंदा अपेक्षेपेक्षा लवकर सुरु झालेल्या आणि सातत्याने कोसळणाऱ्या मुसळधार पावसामुळे कुळे –मेटावाडा परिसरातील शेतकऱ्यांच्या भातपिकावर गंभीर परिणाम झाला असून, अंदाजे ८ लाख रुपयांचे नुकसान झाल्याची माहिती समोर आली आहे.

मेटावाडा शेतकरी संघटनेचे अध्यक्ष नामदेव म्हारदोळकर यांनी दिलेल्या माहितीनुसार, कुळे – मेटावाडा परिसरातील सुमारे ८ एकर क्षेत्रावर १०७ शेतकऱ्यांनी भाताची लागवड केली होती. पिके जोमात असून कापणीसाठी तयार असतानाच अचानक सुरू झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतात पाणी साचले असून कापणीचे काम ठप्प झाले आहे. परिणामी, अनेक पिकांमध्ये कोंब फुटल्याचेही निदर्शनास आले आहे. शेतकऱ्यांनी प्रत्यक्ष लागवडीसाठी प्रत्येकी सुमारे ३० ते ४० हजार रुपये खर्च केले होते. मात्र आता पावसामुळे संपूर्ण श्रम आणि गुंतवणूक वाया गेली आहे, असे म्हारदोळकर यांनी सांगितले. त्यांनी कृषी विभागाकडे नुकसानभरपाईसाठी लेखी मागणी केली आहे.

या भागात कापणीसाठी यंत्र आणून सहा दिवस झाले असले तरी सततच्या पावसामुळे यंत्रे वापरणेही अशक्य झाले आहे. शेतकरी दिवस–रात्र रानडुक्कर, रानगवे यांसारख्या वन्यप्राण्यांपासून संरक्षण देत पिकांचे रक्षण करत होते. मात्र, हवामानातील बदलापुढे त्यांची मेहनत निष्फळ ठरली. शेतकऱ्यांनी सरकारकडे तातडीने आर्थिक मदतीची मागणी केली असून, कृषी विभागाने या परिस्थितीची गांभीर्याने दखल घ्यावी, अशी मागणीही केली आहे. अतिवृष्टीत शेतात कापणी कशी करावी, तसेच कापलेले पीक साठवण्यासाठी सावलीचा पर्याय काय असावा, हेच समजेनासे झाले आहे, अशी खंत काही शेतकऱ्यांनी व्यक्त केली. दरम्यान, कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी नुकसानीची पाहणी करून योग्य ती भरपाई दिली जाईल, असे आश्वासन शेतकऱ्यांना दिले आहे.

या प्रकरणावर प्रतिक्रिया देताना कृषीमंत्री रवी नाईक यांनी सांगितले की, कुळे परिसरातील शेतकऱ्यांच्या नुकसानीबाबत आम्ही गंभीर आहोत. यासंदर्भात संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने पान २ ▶